# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २१ सप्टेंबर २०२२

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५३८/२०२२ भादविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १६/०८/२०२२ रोजी १४.३० वा ते १५.३० वा चे दरम्यान, भाजी मार्केट, घोंगडे वस्ती, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २१/०९/२०२२ रोजी १३.३५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शहाजहान सय्यद शेख, वय- ५४ वर्षे, रा. शास्त्री नगर, कुंभार गल्ली, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १,१०,०००/- रु बजाज कंपनीची रिक्षा काळया पिवळया रंगाची |
| **हकिकत** | | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची रिक्षा क्रं. एम एच १३ सी टी ६५०३ ही वरील ठिकाणी उभी करुन फिर्यादीचे ओळखीचे घोंगडे यांचे कडे भेटण्यासाठी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची वरील वर्णनाची रिक्षा फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोना/ १३८७ बाबर |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५२९/२०२२ भादविसक ३०२ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/०९/२०२२ रोजी पहाटे ०३.३० वा चे सुमारास, घर नं. ३०१, राज मेमोरीयल शाळेजवळ, गंगाई केकडे नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २१/०९/२०२२ रोजी १४.४६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अरुणा दशरथ नारायणकर, वय- २९ वर्षे, रा. घर नं. ३०१, राज मेमोरीयल शाळेजवळ, गंगाई केकडे नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अनोळखी इसम अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचा, मध्यम बांध्याचा, अंदाजे साडे पाच फुट उंचीचा, अंगात काळया रंगाचा फुल बाहयाचा टी शर्ट व काळया रंगाची पॅन्ट असलेला |
| **मयताचे नाव** | : | दशरथ नागनाथ नारायणकर, वय- ३६ वर्षे, रा. घर नं. ३०१, राज मेमोरीयल शाळेजवळ, गंगाई केकडे नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **हकिकत** | | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी व फिर्यादीची मुलगी घरातील हॉल मध्ये झोपले असताना पहाटे साधारण ०३.०० वाजता किचनमधील शिलाई मशीनचा धडधड करुन आवाज आला तेव्हा फिर्यादी उठुन किचन मध्ये गेले असता, फिर्यादीचे पती (मयत) तेथे रक्ताच्या थारोळयात पडलेले होते. फिर्यादी घाबरुन जोरात ओरडले त्यावेळी एक इसम तेथे होता. फिर्यादीच्या ओरडण्याने फिर्यादीची मुलगी उठुन किचनमध्ये आली त्यावेळी फिर्यादीने सदर इसमाचा हात पकडला व मुलीला पुढचा दरवाजा उघडायला सांगितला तेव्हा सदर इसम फिर्यादीच्या बोटाला चावण्याचा प्रयत्न केला तेव्हा फिर्यादीने हात सोडला सदर इसम पाठीमागील दरवाजातुन पळुन गेला.<br>वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत अनोळखी इसमाने अज्ञात कारणावरुन फिर्यादीचे पतीचे गळयावर कोणत्यातरी शस्त्राने मारुन जिवे ठार मारले आहे म्हणून. तपास:- वपोनि/ माने- ८१०८६७५०५० |